# प्रेसनोट

दि.३१/१२/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | पाथर्डी पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.९९९/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | अंबादास गोपीनाथ साठे, वय–४४ वर्ष, धंदा–नोकरी, लिपीक, वर्ग–३, नगररचना विभाग, नगर परिषद, पाथर्डी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २५,०००/– रुपये व तडजोडी अंती १२०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | --- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांना बिअर बार व परमिट रुमचा परवाना काढावयाचा असलेने, त्यांनी त्याकरीता आवश्यक असलेला नगरपरिषद चा नाहरकत दाखला मिळणे करीता नगरपरिषद पाथर्डी येथे अर्ज दिला होता. सदर अर्जावरुन नाहरकत दाखला देणे करीता यातील आरोपी लोकसेवक अंबादास गोपीनाथ साठे, लिपीक, नगररचना विभाग, नगर परिषद, पाथर्डी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर यांनी मुख्याधिकारी लांडगे यांचे करीता म्हणून २५,०००/– रुपयांची तक्रारदार यांच्याकडे मागणी केली. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर कार्यालयाकडे दिलेल्या लाच मागणीचे तक्रारीवरुन दि.२६/११/२०२१ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी लोकसेवक अंबादास गोपीनाथ साठे यांनी मुख्याधिकारी लांडगे यांचे नावाने २५०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १२०००/– रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविली म्हणून आज दि.३१/१२/२०२१ रोजी आरोपी लोकसेवक अंबादास गोपीनाथ साठे यांचेविरुध्द पाथर्डी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर गुन्हा रजिस्टर नंबर ९९९/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर